नि. फौ. ख. क्र. १०१/२०११
CNR No. MHAK070008762011

**नियमित फौजदारी खटला क्र. १०१/२०११ मधील निशाणी १२६ वर आदेश**
**(दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२)**

१. प्रस्तुत अर्ज फिर्यादीने निशाणी १२० वर दिनांक ११.१०.२०२१ रोजी झालेला आदेश बाजुला सारण्याकामी दाखल केला आहे. फिर्यादीचे कथन असे की, दिनांक ११.१०.२०२१ रोजी बस सेवा बंद असल्याने ती तारखेवर हजर राहु शकली नाही. तसेच तिचे वकिल काही अपरिहार्य कारणास्तव हजर राहु शकले नव्हते. त्यामुळे सदर आदेशाबाबात त्यांना माहिती नव्हती. प्रकरणात जिल्हा रुग्णालय, अकोला येथील केससंबंधी कागदपत्रे दाखल होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे, ज्यावर फिर्यादीची केस अवलंबून आहे. सबब, प्रस्तुत अर्ज.

२. आरोपींनी अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले की, अर्ज न्यायप्रक्रियेत बसत नाही. फिर्यादीने आदेशाप्रमाणे पुर्तता केली नाही, ज्याकामी पुरेशी संधी दिली होती. त्यामुळे सदर आदेश झाला आहे. प्रस्तुत अर्ज खारिज होण्यास पात्र आहे व तो खर्चासह खारिज करण्यात यावा.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा तोंडी युक्तीवाद ऐकला.

४. अभिलेख पाहिला असता फिर्यादीने निशाणी १२० वर जिल्हा रुग्णालय, अकोला येथून काही वैद्यकिय कागदपत्रे दाखल करण्याकामी दिनांक ०४.०१.२०२० रोजी अर्ज दाखल केला होता. त्यावर दिनांक ०४.०३.२०२० रोजी आरोपींनी म्हणणे दाखल केले. त्यानंतर कोरोना प्रादुर्भावामुळे माहे जुलै २०२१ पावेतो काही युक्तीवाद ऐकता आला नाही. न्यायालयाचे कामकाज नियमितरित्या चालु झाल्यानंतर दिनांक ०४.०८.२०२१ व दिनांक २५.०८.२०२१ रोजी फिर्यादीचे वकिल गैरहजर असल्याने तहकुबी दिली. त्यानंतर सुध्दा दिनांक २३.०९.२०२१ रोजी फिर्यादीचे वकिल गैरहजर होते. त्यादिवशी फक्त आरोपीच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकुन फिर्यादीचा निशाणी १२० वरील सदर अर्ज मंजुर करण्यात आला आणि प्रकरण फिर्यादीतर्फे अनुपालनाकरीता दिनांक ०७.१०.२०२१ रोजी ठेवण्यात आले. दिनांक ०७.१०.२०२१ व त्यानंतर दिनांक ११.१०.२०२१ रोजी सुध्दा फिर्यादीने आदेशाचे अनुपालन न केल्याने निशाणी १२० वरील दिनांक २३.०९.२०२१ रोजीचा आदेश अपास्त करण्यात आला. त्यानंतर प्रकरण फिर्यादीच्या पुढील पुराव्याकामी दिनांक २०.११.२०२१ व नंतर दिनांक १५.१२.२०२१ रोजीपर्यंत तहकुब करण्यात आले. प्रस्तुत अर्ज फिर्यादीने दिनांक १५.१२.२०२१ रोजी दाखल केला आहे.

५.   वरीलप्रमाणे फिर्यादीला संधी देऊनही तिने योग्यवेळेत अनुपालन केले नसल्याने वरीलप्रमाणे आदेश झाले आहेत. प्रकरणाचा अभिलेख पाहता फिर्यादीने निशाणी १२० अर्जात मागणी केल्याप्रमाणे सदर वैद्यकिय कागदपत्रे संबंधित (relevant) आणि पुराव्याकामी महत्वाचे असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्याकरीताच निशाणी १२० वरील फिर्यादीचा अर्ज तिचा युक्तीवाद न ऐकता मंजुर करण्यात आला होता. प्रकरण १० वर्षे जुने झालेले आहे. त्यामुळे फिर्यादीने प्रत्येक तारखेला एकतर स्वतः किंवा वकिलांमार्फत सुनावणीत सहभाग घेणे अपेक्षित आहे. परंतु वर विषद केल्याप्रमाणे फिर्यादीला वेळोवेळी संधी मिळूनही त्याचा लाभ घेतला नाही. असे जरी असले तरी, ज्याअर्थी सदर कागदपत्रे अभिलेखावर येणे प्रकरणाचा योग्य निकाल लागण्याकामी महत्वाचे आहेत, त्याअर्थी न्यायाच्या हितास्तव सदर आदेश अपास्त करणे आवश्यक वाटते. परंतु ज्याअर्थी फिर्यादीच्या कसुरीमुळे प्रकरणात विलंब होत आहे आणि आरोपींना नाहक त्रास होत आहे त्याअर्थी अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, आदेश

**: आ दे श :**

१. अर्ज फिर्यादीने आरोपींना रक्कम रुपये ५००/– खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. सदर खर्च फिर्यादीने या आदेशाच्या तारखेपासून १० दिवसांच्या आत अदा करावा.

३. खर्च दिल्यावर निशाणी १२० वरील दिनांक २३.०९.२०२१ रोजीचा आदेश पुनर्संचयित करुन दिनांक ११.१०.२०२१ रोजीचा आदेश अपास्त करण्यात येतो. त्याप्रमाणे फिर्यादीने प्रोसेस द्यावी.

४. वरील प्रमाणे खर्च व प्रोसेस न दिल्यास प्रस्तुत आदेश आपोआप रद्द होईल तसेच फिर्यादीचा पुरावा बंद करण्यात येईल.

५. दोन्ही पक्षांनी नोंद घ्यावी.

बाळापूर.
दिनांकः ११.०२.२०२२

(चं. प्र. रघुवंशी)
न्यायदंडाधिकारी, वर्ग–१, बाळापूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shaikh Rafique Shaikh Rasheed |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 11/02/2022. |
| Signed by Presiding Officer on | : | 11/02/2022. |
| Uploaded on | : | 11/02/2022. |

---